**श्रीमहालक्ष्मी**®
info@mahalaxmipanchang.com

# जानेवारी २०२५

सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा.लि.
१२१७/२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ,
कोल्हापूर. फोन : ०२३१-२५३०३२५

## श्री लक्ष्मीव्रत असे करा



### ।। श्री लक्ष्मीव्रत कथा ।।

द्वापार युगातील गोष्ट. त्या काळी सौराष्ट्र देशामध्ये भद्रश्रवा नावाचा राजा राज्य करीत होता. तो मोठा विद्वान व वेदांत जाणणारा होता. त्याच्या राणीचे नाव सुरतचंद्रिका असे होते. त्यांना सात पुत्र व शामबाला नावाची एक कन्या होती. राजकन्या एके दिवशी आपल्या मैत्रिणींसह नगराबाहेरील उद्यानात विहार करीत असताना राजवाड्यामध्ये एक चमत्कारिक गोष्ट घडून आली. त्या दिवशी लक्ष्मीच्या मनात आले की, आपण राजवाड्यात जाऊन सुरतचंद्रिका राणीस प्रजेच्या कल्याणासाठी लक्ष्मीव्रताची आठवण करून द्यावी. त्यामुळे माझे वास्तव्य राजवाड्यात राहून राजाकडून प्रजेचे कल्याण होईल. अन्यथा मी सामान्य माणसाकडे वास केल्यास फक्त एकट्याचा फायदा होईल, म्हणून जनकल्याणार्थ राजवाड्यात राहणे बरे असा विचार करून लक्ष्मीने एका वृध्द स्त्रीचे रूप घेतले व काठी टेकीत ती राजवाड्याच्या मुख्य दरवाजापाशी आली तेव्हा तेथील द्वारपालाने लक्ष्मीला विचारले, ''आपणांस कोणास भेटावयाचे आहे?'' तेव्हा लक्ष्मीने सांगितले की, ''मला सुरतचंद्रिका राणीसाहेबांना भेटावयाचे आहे.'' द्वारपालाने लगेच राणीच्या एका दासीला बोलावून लक्ष्मीची भेट घालून दिली. दासीने अधिक चौकशी करण्याकरिता लक्ष्मीरूपातील वृध्द स्त्रीला प्रश्न विचारले, ''आपण कोण? आपले नाव काय? आपण कोठून आलात? आपले राणीसाहेबांकडे काय काम आहे?''

लक्ष्मीने दासीला सांगितले की, ''मी द्वारकेत राहणाऱ्या भुवनेश नावाच्या विद्वान ब्राह्मणाची पत्नी असून, माझे नाव कमला आहे. मी येथे येण्याचे कारण तुला थोडक्यात सांगते, ऐक!''

तुमची सुरतचंद्रिका राणी मागच्या जन्मी एका वैश्याची पत्नी होती. तो वैश्य दरिद्री होता, त्यामुळे नवरा-बायकोचे वारंवार तंटे होत असत. एके दिवशी भांडण करून ती घराबाहेर पडली व रडत भटकू लागली. ते पाहून मला तिची दया आली. मी तिची विचारपूस करून तिच्या दुःखाचे कारण ऐकले व तिचे दारिद्र्य दूर होण्यासाठी तिला लक्ष्मीव्रत करण्याचा उपदेश केला. लक्ष्मीव्रत कसे करावे याची तिला माहिती सांगितली. त्याप्रमाणे तिने लक्ष्मीव्रत केले. व्रताच्या प्रभावाने ती श्रीमंत व सुखी झाली. लक्ष्मी तिच्या घरी नांदू लागल्यामुळे त्या पती-पत्नीचा संसार सुखाचा झाला व पुढे पुष्कळ वर्षे त्यांनी ऐश्वर्य भोगले. पुढे त्यांना यथाकाल मृत्यू आला. लक्ष्मीव्रताच्या प्रभावाने त्यांना लक्ष्मी प्रसन्न झाल्यामुळे पुढील जन्म राजकुळात मिळाला. मागील जन्मी केलेल्या लक्ष्मीव्रताच्या प्रभावामुळे सुरतचंद्रिका राजघराण्यात सर्व ऐश्वर्य भोगत आहे; परंतु लक्ष्मीव्रताचा आता तिला विसर पडला आहे म्हणून सुरतचंद्रिकेस लक्ष्मीव्रताची आठवण करून देण्यासाठी मी येथे आले आहे.

हे सर्व त्या दासीने ऐकल्यावर तिला मोठे कौतुक वाटले. ती म्हणाली, ''आपण कृपाकरून लक्ष्मीव्रत केव्हा व कसे करावे, हे मला सांगाल काय? तेव्हा वृध्द स्त्रीरूपातील लक्ष्मी म्हणाली, ''ऐक, मार्गशीर्ष महिन्यातील प्रत्येक गुरुवारी सकाळी नदी किंवा विहिरीवर स्नान करून, पाच डहाळे काढून भरल्या कळशीत ठेवावेत. रांगोळी काढून पाट मांडावा व पाटावर साळी घालून त्यावर कळशी ठेवावी. कळशीमध्ये नाणे, सुपारी, मोती, पोवळे, दुर्वा घालाव्यात. जवळ समई लावावी. कळशीवर आठ बाजूला हळदीकुंकवाची बोटे ओढावीत. 'लक्ष्म्यै नमः' म्हणून पूजा करावी व तुपाचे निरांजन ओवाळावे. पिण्यासाठी वाटीमध्ये दूध ठेवावे व पुऱ्यालाडवाचा नैवेद्य दाखवावा. काही फळे ठेवावीत. पैसा, सुपारी, दक्षिणा, विडा ठेवावा आणि आई लक्ष्मी, अशीच येत जा, मुलाबाळांना सुखी ठेव, मला सौभाग्य दे, तुझी पूजा करून घे, सोन्याचांदीचा प्रकाश पडू दे, दूधदुभत्याची लयलूट होऊ दे, माझा नमस्कार तुला पोहोचू दे, तुझा आशीर्वाद मला मिळू दे. भरली घागर घरात राहू दे, तेलतुपाचा दिवा तुला दिसू दे, माझे बोल तू ऐकावे, तुझे बोल मी मानावे, हीच प्रार्थना. अशी मनोभावे प्रार्थना करावी. सायंकाळी गाईची पूजा करावी. तिला पुरणवरणाचा नैवेद्य दाखवावा आणि आपण व्रतस्थ रहावे. रात्री जागर करावा. उणेदुणे बोलू नये. सकाळी कळशीतील पाणी नदी किंवा विहिरीत सोडावे. पाच डहाळे पाच ठिकाणी टाकावेत आणि ज्या ठिकाणी पूजा केली असेल, त्या ठिकाणी हळदीकुंकू वाहावे. अशा तऱ्हेने मार्गशीर्ष महिन्यातील हे व्रत चार गुरुवारी करावे व आपल्या ऐपतीप्रमाणे दानधर्म करावा.

हे सर्व लक्षात घेऊन व्रत कर. तुझे कल्याण होईल व तुला कोणी भक्तीने विचारल्यास या व्रताची माहिती सांग. अभक्तीने विचारल्यास या व्रताची माहिती सांगू नकोस. दासीने हे सर्व मन लावून ऐकून घेतले व नंतर त्या वृध्द स्त्रीला म्हणाली, ''आजीबाई मी तुमचा बराच वेळ घेऊन तुम्हाला थांबविले, याबद्दल मला क्षमा करा. आत जाऊन राणीसाहेबांना तुम्ही आल्याचे सांगते.'' त्याप्रमाणे दासीने राणीवशात जाऊन एक वृध्द ब्राह्मण स्त्री भेटावयास आल्याचे राणीला सांगितले.

सुरतचंद्रिका राणीला वैभवाचा मोठा गर्व झाला होता; त्यामुळे तिला दासीचा निरोप आवडला नाही व उलट राग आला. राणी उद्दाम झाली होती. ती रागाने बाहेर आली व त्या वृध्द स्त्रीला म्हणाली, ''काय ग थेरडे, तू कशाला आलीस येथे? कुणी सोडले तुला येथवर? चल चालती हो येथून!''

लक्ष्मी म्हणाली, ''दुष्टे इतकी उन्मत्त कशाने झालीस? तुझे उद्दाम वर्तन पाहून मला क्षणभरही येथे रहावेसे वाटत नाही. आजचा दिवस लक्ष्मीचा असता तू माझी अवहेलना केलीस, त्याचे फळ तुला लवकरच मिळेल.'' असे म्हणून लक्ष्मी तेथून चालूही लागली. लक्ष्मी राजवाड्यातून रागाने बाहेर पडत असताना वाटेत शामबालेच्या दृष्टीस पडली. तेव्हा शामबालेने तिची आस्थेने विचारपूस केली. लक्ष्मीने राजवाड्यात घडलेली सर्व हकिकत तिला सांगितली, कारण शामबालेने तेथे राहू नये असे तिला वाटत होते. शामबालेने लक्ष्मीचे बोलणे शांतपणे व नम्रपणे ऐकून घेतले व त्याच दिवशी व्रतास आरंभ केला. मार्गशीर्ष महिन्यातील तो पहिलाच गुरुवार होता. लक्ष्मीच्या प्रसादाने शामबालेचा विवाह सिध्देश्वर नामक राजाच्या मालाधार नामक राजपुत्राशी झाला व शामबाला पतिगृही राजवैभवात नांदू लागली.

इकडे लक्ष्मीचा कोप होऊन भद्रश्रवा राजाचे राज्य लयास गेले. सर्व संपत्ती जाऊन राजा राज्यभ्रष्ट झाला. त्याचे सर्व वैभव जाऊन त्यास दरिद्री अवस्था प्राप्त झाली. राणीच्या आडमुठ्या वागण्यामुळे राजकुमारही सोडून गेले. वेळेवर खाण्यास अन्न नाही, पांघरावयास वस्त्र नाही अशी स्थिती झाल्यामुळे राणीने आपल्या जावयाकडे जाऊन साहाय्य मागण्याची राजाला सूचना केली. राजा त्याप्रमाणे फिरत फिरत जावयाच्या राजधानीत आला व नदीकाठी विश्रांती घेत असता त्याला शामबालेच्या दासीने पाहिले व राजवाड्यात जाऊन शामबालेच्या कानावर घातले. ते ऐकून शामबालेने आपल्या वडिलांना वस्त्रे, भूषण व घोडा पाठवून मोठ्या आदराने बोलावून घेतले. त्यांचा आदर-सत्कार करून घरचे वर्तमान विचारले. सर्व ऐकून शामबालेस वाईट वाटले. शामबालेने पित्याचा चार दिवस पाहुणचार करून, द्रव्य देऊन निरोप दिला.

भद्रश्रवा राजा ते द्रव्यांचे भांडे घेऊन घरी गेला आणि त्याने सुरतचंद्रिकेस ते दाखविताच त्याचे कोळसे झाले. काही दिवसांनी सुरतचंद्रिका आपल्या लेकीकडे गेली. तो दिवस मार्गशीर्ष महिन्यातील चौथा गुरुवार होता. शामबाला नेहमीप्रमाणे लक्ष्मीव्रताच्या गडबडीत होती. पूजा आटोपून प्रार्थना करीत होती. राणीने ते पाहिले, तेव्हा त्या व्रताची तिला आठवण झाली. आपली चूक तिला कळली तिने लक्ष्मीची क्षमा मागितली व कळकळीने प्रार्थना करून तिने लक्ष्मीव्रतही केले व मुलीला घडलेली सर्व हकिकत सांगितली. मातृपितृभक्त मुलीला आपल्या आईवडिलांची दया आली. तिने आपल्या नवऱ्याला सांगून आपल्या बापाचे राज्य परत मिळवून दिले व आईला राजवाड्यात पोहोचविले. मग तिचे भाऊही घरी परत आले. राणीने अत्यंत भक्तीने लक्ष्मीव्रताला सुरुवात केली. लक्ष्मी तिच्यावर पुन्हा प्रसन्न झाली व पूर्वीप्रमाणेच राज्यकारभार सुरू झाला.

ही कथा ऐकणाऱ्यांना, वाचणाऱ्यांना आणि व्रत करणाऱ्यांना सुखसमाधान आणि वैभव मिळेल. वैभव मिळाल्यावर उतू नये, गर्वाने सर्वांना तुच्छ लेखू नये, दानधर्म विसरू नये म्हणजे राजाराणी सुखी झाली तसे तुम्ही आम्ही सुखी होऊ.

## • मकर संक्रांती •

।। श्री गणेशाय नमः ।।
।। श्री सरस्वत्यै नमः ।।

**श्री शके १९४६ च्या मकर संक्रांतीचे फल** – मंगळवार दि.१४ जानेवारी २०२५ म्हणजेच शके १९४६ पौष कृ.१ रोजी सकाळी ८.५४ वाजता सूर्य मकर राशीत प्रवेश करीत आहे.

**संक्रांतीचा पुण्यकाल** – मंगळवार दि.१४ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८.५४ पासून संध्याकाळी ४.५४ पर्यंत आहे.

सूर्याचे मकर संक्रमण बालव करणावर होत असल्याने वाहन वाघ असून उपवाहन घोडा आहे. तिने पिवळे वस्त्र परिधान केले असून हातात गदा घेतली आहे. केशराचा टिळा लावलेला आहे. वयाने कुमारी असून बसलेली आहे. वासाकरिता जाईचे फूल घेतलेले आहे. पायस भक्षण करीत आहे. सर्प जाति आहे. भूषणार्थ मोती धारण केले आहे. वारनांव व नाक्षत्रनांव महोदरी असून सामुदाय मुहूर्त ४५ आहेत. पूर्वेकडून पश्चिमेस जात आहे व वायव्य दिशेस पाहत आहे.

**संक्रांतीचे फल** – संक्रांतीने ज्या वस्तू परिधान केल्या आहेत त्या वस्तू महाग होतील. संक्रांती जेथून आली आहे तेथील जनतेला सुख प्राप्त होईल.

**पर्वकालात द्यावयाचे दान** – नवे भांडे, गाईला घास, अन्न, तिलपात्र, गूळ, तीळ, सोने, भूमी, गाय, वस्त्र, घोडा इत्यादी यथाशक्ती दाने द्यावीत.

**किंक्रांत** – करिदिन बुधवार दि.१५ जानेवारी २०२५ रोजी आहे.

**संक्रांतीमध्ये वर्ज्य कर्मे** – दात घासणे, कठोर बोलणे, वृक्ष-गवत तोडणे, गाई-म्हशींची धार काढणे व कामविषयक सेवन ही कामे करू नयेत.

## जन्म नक्षत्रावरून संक्रांतीची शुभाशुभ फले

| प्रवास | भोग | व्यथा | वस्त्रलाभ | द्रव्यनाश | विपुल धन |
|---|---|---|---|---|---|
| आर्द्रा<br>पुनर्वसु<br>पुष्य | आश्लेषा-मघा<br>पू.फाल्गुनी-उ.फाल्गुनी<br>हस्त-चित्रा | स्वाती<br>विशाखा<br>अनुराधा | ज्येष्ठा-मूळ<br>पू.षाढा-उ.षाढा<br>श्रवण-धनिष्ठा | शततारका<br>पू.भाद्रपदा<br>उ.भाद्रपदा | रेवती-अश्विनी<br>भरणी-कृत्तिका<br>रोहिणी-मृग |

## संकष्ट चतुर्थी
चंद्रोदय दि.१७ जानेवारी

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बारामती | ०९.२३ | रत्नागिरी | ०९.३२ | मार्गाव | ०९.३० | बेंगलोर | ०९.१४ | बिदर | ०९.११ |
| | | | | सातारा | ०९.२७ | चिपळूण | ०९.२७ | फोंडा | ०९.३० | बेळगाव | ०९.२९ | कारवार | ०९.३० |
| | | | | कराड | ०९.२८ | राजापूर | ०९.२८ | पणजी | ०९.३० | बागलकोट | ०९.२१ | हुबळी | ०९.२५ |
| मुंबई | ०९.३२ | पनवेल | ०९.३१ | कोल्हापूर | ०९.२८ | दापोली | ०९.३२ | छ.संभाजीनगर | ०९.२२ | गोकाक | ०९.२५ | धारवाड | ०९.२५ |
| ठाणे | ०९.३१ | पालघर | ०९.३० | सांगली | ०९.२४ | सावंतवाडी | ०९.२९ | अहमदनगर | ०९.२३ | निपाणी | ०९.२९ | म्हैसूर | ०९.१९ |
| कल्याण | ०९.३१ | नाशिक | ०९.२६ | सोलापूर | ०९.१९ | कणकवली | ०९.२९ | धाराशिव | ०९.१९ | अथणी | ०९.२४ | हैद्राबाद | ०९.१२ |
| डोंबिवली | ०९.३१ | महाड | ०९.३२ | पंढरपूर | ०९.२३ | वेंगुर्ला | ०९.२९ | लातूर | ०९.१५ | मुधोळ | ०९.२५ | दिल्ली | ०९.०६ |
| अलिबाग | ०९.३१ | पुणे | ०९.२७ | मंगळवेढा | ०९.२३ | म्हापसा | ०९.२९ | नागपूर | ०९.०५ | विजयपूर | ०९.२० | बडोदा | ०९.२९ |

## जानेवारी महिन्यातील तिथीविषयक माहिती येथे पहा

**दि.७ पंचक सायं.५.४९ पर्यंत**
**श्री तुळजाभवानीदेवी निद्राकाल समाप्त तुळजापूर**
श्री वाडवळेश्वर यात्रा पाणखोल (जुवे) मालवण
विष्णुदास कवी पुण्यतिथी माहुर
**दि.१० उत्तराषाढार्कः उ.रात्री २.२१**
दासगणू म.जयंती गोरटा जि.नांदेड
**दि.११ अमृत स.७.१६ ते दु.१२.२९**
अण्णाबुवा कालगांवकर जयंती पुणे
खंडोबा यात्रा मोराळे व पाचवड ता.खटाव जि.सातारा
श्री वरदायिनीदेवी यात्रा लाखवड ता.महाबळेश्वर
**दि.१२ राष्ट्रीय युवक दिन**
**पारशी शेहरेवार मासारंभ**
वाग्देव महाराज रथोत्सव वाठार स्टेशन ता.कोरेगाव
चंडीराम म.पु.ति.खेड-राजगुरूनगर
श्री धारेश्वर जत्रा घोटगे-भेडशी जि.सिंधुदुर्ग
सतीमाता यात्रा जाधववाडी साखरपा
विशाळगड उरूस प्रारंभ
**दि.१३ शाकंभरी व कालरात्री नवरात्र समाप्ती**
**जिजामाता जयंती सिंदखेडराजा जि.बुलढाणा**
**श्री रेणुका यात्रा सौंदत्ती**
श्री बनशंकरी रथ बदामी
उत्तवेश्वर यात्रा वाळणे गावडूस ता.महाबळेश्वर
श्री भैरवनाथ यात्रा कमान(चास) ता.राजगुरूनगर जि.पुणे
थापलिंग यात्रा शिंगवे व नागापूर ता.आंबेगाव जि.पुणे
श्रृंगेरीदेवी यात्रा ब्रह्मगाव ता.आष्टी
भगवती यात्रा माडबन जि.रत्नागिरी
रासाईदेवी यात्रा आचिर्णे ता.वैभववाडी
देवी भगवती यात्रा प्रारंभ मुणगे ता.देवगड
श्री रवळनाथ यात्रा नाते ता.महाड
काळोबा जत्रा सातार्डा ता.सावंतवाडी
चंदूर यात्रा ता.हातकणंगले
नाथ यात्रा प्रा.खरसुंडी ता.आटपाडी
रोकडाईदेवी यात्रा माळेगाव ता.माढा
वाग्देव महाराज पुण्यतिथी वाठार स्टेशन ता.कोरेगाव
शाकंभरीदेवी उत्सव बदामीनगर सातारा
**दि.१४ वीर जीवा महाला पुण्यदिन**
प्रयाग स्नानारंभ
मार्लेश्वर यात्रा मारळ जि.रत्नागिरी
सातेरीदेवी उत्सव माजगाव ता.सावंतवाडी
केशवबुवा पुरकर पु.ति.पारनेर(नगर)
श्री सिध्दरामेश्वर यात्रा दुधणी ता.अक्कलकोट
**दि.२०** लोटांगणे महाराज पुण्यतिथी ढेबेवाडी ता.पाटण जि.सातारा
**दि.२६** यल्लमादेवी यात्रा वायफळे ता.तासगाव
**दि.२८** संत तुकाविप्र समाधी दिन अंजनवती ता.जि.बीड
**दि.२९ विशालतीर्थ यात्रा करवीर,** कुम्भुर, बहे व शिंगणापूर ता.करवीर
**कोपेश्वर यात्रा खिद्रापूर ता.शिरोळ**
ब्रह्मदेव यात्रा(जैन) स्तवनिधी निपाणी
दावलमलिक यात्रा शेरा जि.लातूर
श्री खंडोबा यात्रा मैलापूर(नळदुर्ग) ता.तुळजापूर
**दि.30 हुतात्मा दिन**
**पंचक सायं.६.3९ नंतर**
ओमशक्तिबाबा पुण्यतिथी भुलेश्वर यवत ता.दौंड
रामरथ मिरवणूक नागठाणे जि.सातारा
बिरदेव यात्रा एकसंबा ता.चिकोडी
ह.वल्लीसो। उरूस रामपूर पेठ किल्ले पन्हाळा
**दि.3१** मोसेवाडी यात्रा ता.खेड जि.पुणे
गोविंद म.उपळेकर जयंती फलटण
कुंतीमाता यात्रा कोथाळे ता.मोहोळ
श्रीराम महाराज पुण्यतिथी नावघाट खेडी मध्य प्रदेश

## पंचांग (मुंबई वेळेप्रमाणे)
### जानेवारी २०२५ — पौष-माघ
श्री शालिवाहन शके १९४६ — विक्रम संवत् २०८१

| ता. | वार | तिथी | ता.मि. पर्यंत | नक्षत्र | ता.मि. पर्यंत | योग | ता.मि. पर्यंत | करण | ता.मि. पर्यंत | चंद्रराशी | सूर्योदय | सूर्यास्त | भा.सौर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जानेवारी | | पौष | | | | | | | | | | | पौष |
| ०१ | बुध | शु.द्वितीया | २६.२४ | उत्तराषाढा | २३.४५ | व्याघात | १७.०६ | बालव | १४.५५ | मकर | ०७.१४ | १८.११ | ११ |
| ०२ | गुरु | शु.तृतीया | २५.०८ | श्रवण | २३.१० | हर्षण | १४.५७ | तैतिल | १३.४८ | मकर | ०७.१४ | १८.११ | १२ |
| ०३ | शुक्र | शु.चतुर्थी | २३.३९ | धनिष्ठा | २२.२१ | वज्र | १२.३६ | वणिज | १२.२५ | १०.४७ नं.कुंभ | ०७.१५ | १८.१२ | १३ |
| ०४ | शनि | शु.पंचमी | २२.०१ | शततारका | २१.२३ | सिध्दि | १०.०७ | बव | १०.५१ | कुंभ | ०७.१५ | १८.१३ | १४ |
| ०५ | रवि | शु.षष्ठी | २०.१५ | पू.भाद्रपदा | २०.१७ | व्यतिपात | ०७.३१ | कौलव | ०९.०८ | १४.३४ नं.मीन | ०७.१५ | १८.१३ | १५ |
| | | | | | | वरियन | २८.५० | | | | | | |
| ०६ | सोम | शु.सप्तमी | १८.२३ | उ.भाद्रपदा | १९.०६ | परिघ | २६.०४ | गर | ०७.२० | मीन | ०७.१५ | १८.१४ | १६ |
| | | | | | | | | विष्टि | २९.२५ | | | | |
| ०७ | मंगळ | शु.अष्टमी | १६.२६ | रेवती | १७.४९ | शिव | २३.१५ | बालव | २७.२६ | मीन | ०७.१६ | १८.१४ | १७ |
| ०८ | बुध | शु.नवमी | १४.२६ | अश्विनी | १६.२९ | सिध्द | २०.२२ | तैतिल | २५.२४ | १७.४९ नं.मेष | ०७.१६ | १८.१५ | १८ |
| ०९ | गुरु | शु.दशमी | १२.२२ | भरणी | १५.०६ | साध्य | १७.२९ | वणिज | २३.२१ | मेष | ०७.१६ | १८.१६ | १९ |
| १० | शुक्र | शु.एकादशी | १०.१९ | कृत्तिका | १३.४५ | शुभ | १४.३६ | बव | २१.२० | २०.४६ नं.वृषभ | ०७.१६ | १८.१६ | २० |
| ११ | शनि | शु.द्वादशी | ०८.२१ | रोहिणी | १२.२९ | शुक्ल | ११.४८ | कौलव | १९.२६ | वृषभ | ०७.१६ | १८.१७ | २१ |
| | | शु.त्रयोदशी | ३०.३३ | | | | | | | | | | |
| १२ | रवि | शु.चतुर्दशी | २९.०२ | मृग | ११.२४ | ब्रह्मा | ०९.०८ | गर | १७.४६ | २३.५५ नं.मिथुन | ०७.१६ | १८.१८ | २२ |
| | | | | | | ऐंद्र | ३०.४३ | | | | | | |
| १३ | सोम | पौर्णिमा | २७.५६ | आर्द्रा | १०.३७ | वैधृति | २८.३८ | विष्टि | १६.२६ | मिथुन | ०७.१७ | १८.१८ | २३ |
| १४ | मंगळ | कृ.प्रतिपदा | २७.२१ | पुनर्वसु | १०.१६ | विष्कंभ | २६.५७ | बालव | १५.३४ | २८.१८ नं.कर्क | ०७.१७ | १८.१९ | २४ |
| १५ | बुध | कृ.द्वितीया | २७.२३ | पुष्य | १०.२७ | प्रीति | २५.४५ | तैतिल | १५.१७ | कर्क | ०७.१७ | १८.२० | २५ |
| १६ | गुरु | कृ.तृतीया | २८.०५ | आश्लेषा | ११.१५ | आयुष्मान | २५.०५ | वणिज | १५.३९ | कर्क | ०७.१७ | १८.२० | २६ |
| १७ | शुक्र | कृ.चतुर्थी | २९.३० | मघा | १२.४४ | सौभाग्य | २४.५५ | बव | १६.४२ | ११.१५ नं.सिंह | ०७.१७ | १८.२१ | २७ |
| १८ | शनि | कृ.पंचमी | अहोरात्र | पू.फाल्गुनी | १४.५० | शोभन | २५.१५ | कौलव | १८.२५ | सिंह | ०७.१७ | १८.२१ | २८ |
| १९ | रवि | कृ.पंचमी | ०७.३० | उ.फाल्गुनी | १७.२९ | अतिगंड | २५.५६ | गर | २०.४१ | २१.२७ नं.कन्या | ०७.१७ | १८.२२ | २९ |
| २० | सोम | कृ.षष्ठी | ०९.५८ | हस्त | २०.२८ | सुकर्मा | २६.५१ | विष्टि | २३.१७ | कन्या | ०७.१७ | १८.२३ | ३० |
| | | | | | | | | | | | | | माघ |
| २१ | मंगळ | कृ.सप्तमी | १२.३९ | चित्रा | २३.३५ | धृति | २७.४८ | बालव | २५.५९ | कन्या | ०७.१७ | १८.२३ | १ |
| २२ | बुध | कृ.अष्टमी | १५.१७ | स्वाती | २६.३३ | शूल | २८.३६ | तैतिल | २८.३० | १०.०२ नं.तूळ | ०७.१७ | १८.२४ | २ |
| २३ | गुरु | कृ.नवमी | १७.३६ | विशाखा | २९.०७ | गंड | २९.०५ | वणिज | ३०.३५ | तूळ | ०७.१७ | १८.२५ | ३ |
| २४ | शुक्र | कृ.दशमी | १९.२४ | अनुराधा | ३१.०६ | वृध्दि | २९.०७ | बव | अहोरात्र | २२.३१ नं.वृश्चिक | ०७.१६ | १८.२५ | ४ |
| २५ | शनि | कृ.एकादशी | २०.३१ | ज्येष्ठा | अहोरात्र | ध्रुव | २८.३७ | बव | ०८.०३ | वृश्चिक | ०७.१६ | १८.२६ | ५ |
| २६ | रवि | कृ.द्वादशी | २०.५४ | ज्येष्ठा | ०८.२५ | व्याघात | २७.३३ | कौलव | ०८.४८ | वृश्चिक | ०७.१६ | १८.२६ | ६ |
| २७ | सोम | कृ.त्रयोदशी | २०.३४ | मूळ | ०९.०१ | हर्षण | २५.५६ | गर | ०८.४९ | ०८.२५ नं.धनू | ०७.१६ | १८.२७ | ७ |
| २८ | मंगळ | कृ.चतुर्दशी | १९.३६ | पूर्वाषाढा | ०८.५८ | वज्र | २३.५१ | विष्टि | ०८.०९ | धनू | ०७.१६ | १८.२८ | ८ |
| | | | | | | | | चतुष्पाद | ३०.५४ | | | | |
| २९ | बुध | अमावास्या | १८.०५ | उत्तराषाढा | ०८.२० | सिध्दि | २१.२१ | किंस्तुघ्न | २९.१० | १४.५१ नं.मकर | ०७.१६ | १८.२८ | ९ |
| | | | | श्रवण | ३१.१४ | | | | | | | | |
| | | माघ | | | | | | | | | | | |
| ३० | गुरु | शु.प्रतिपदा | १६.११ | धनिष्ठा | २९.५० | व्यतिपात | १८.३३ | बालव | २७.०६ | मकर | ०७.१५ | १८.२९ | १० |
| ३१ | शुक्र | शु.द्वितीया | १३.५९ | शततारका | २८.१४ | वरियन | १५.३२ | तैतिल | २४.४९ | १८.३५ नं.कुंभ | ०७.१५ | १८.२९ | ११ |

दि.१ जानेवारी रोजी सूर्योदयी : रवि, चंद्र-धनू, मंगळ-कर्क, बुध-वृश्चिक, गुरु-वृषभ, शुक्र, शनि-कुंभ, हर्षल-मेष, नेपच्यून-मीन, प्लुटो-मकर राशीत राहील. दि.४ जानेवारी बुध-धनू, दि.१४ जानेवारी रवि-मकर, दि.२१ जानेवारी मंगळ-वृषभ(व), दि.२४ जानेवारी बुध-मकर, दि.२७ जानेवारी शुक्र-मीन राशीत प्रवेश करील.
पौष पौर्णिमा प्रारंभ- सोमवार दि.१३ जानेवारी पहाटे ५.०२, समाप्ती- सोमवार दि.१३ जानेवारी उत्तररात्री ३.५६
पौष अमावास्या प्रारंभ- मंगळवार दि.२८ जानेवारी रात्री ७.३६, समाप्ती- बुधवार दि.२९ जानेवारी सायं.६.०५